## धोरणात्मक व्यापार आणि तंत्रज्ञानासह आर्थिक सुरक्षेवर भारत-जपान संवादाची पहिली फेरी

27 नोव्हेंबर 2024

परराष्ट्र सचिव श्री विक्रम मिस्री यांनी जपानच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे उपमंत्री श्री मासाटाका ओकानो यांच्या समवेत 27 नोव्हेंबर 2024 रोजी टोकियो येथे धोरणात्मक व्यापार आणि तंत्रज्ञानासह आर्थिक सुरक्षेवरील भारत-जपान संवादाच्या पहिल्या फेरीचे सह-अध्यक्षत्व स्विकारले. या संवादाला दोन्ही सरकारांची संबंधित मंत्रालये, विभाग आणि एजन्सी उपस्थित होत्या, ज्याची घोषणा 20 ऑगस्ट 2024 रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या भारत-जपान 2+2 मंत्रिस्तरीय परिषदेत करण्यात आली होती.

2. या बैठकीत दोन्ही देशांना त्यांच्या आर्थिक सुरक्षा धोरणांवर विचारविनिमय करण्याची, औद्योगिक आणि तांत्रिक स्थिरता निर्माण करण्यासाठी भागीदारी मजबूत करण्याची आणि प्रमुख तंत्रज्ञानाच्या संशोधन आणि वापरामध्ये सहकार्याला प्रोत्साहन देण्याची संधी उपलब्ध झाली. उभय पक्षांनी आर्थिक हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी आणि भारत आणि जपानमधील संबंधित पक्षांमधील व्यापार आणि शैक्षणिक भागीदारीसाठी धोरणात्मक सुविधेद्वारे ओळखल्या गेलेल्या क्षेत्रांमध्ये मजबूत पुरवठा साखळी आणि महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी घनिष्ठ सहयोगावर भर दिला. सामायिक हितसंबंधांच्या क्षेत्रात प्रतिभेची देवाणघेवाण आणि कौशल्य उन्नत करण्याच्या मार्गांवर देखील त्यांनी चर्चा केली.

3. उभय पक्षांनी महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये उत्तम समग्र सहयोगाद्वारे ठोस परिणाम साध्य करण्यावर सहमती दर्शवली. त्यांनी या संवादाला भारत-जपान विशेष धोरणात्मक आणि जागतिक भागीदारीत समकालीन सुसंगतता आणण्यासाठी एक महत्त्वपूर्ण आणि वेळेवर उचललेले पाऊल म्हणून मान्यता दिली.

**नवी दिल्ली**

**27 नोव्हेंबर 2024**